# प्रेसनोट

नाशिक,
दि. ०५/०५/२०२२

**आलोसे रमण तुळशिराम गायकवाड, पोलीस हवालदार, ब.नं.१२४३, नेमणुक अभोणा पोलीस स्टेशन, जि. नाशिक ग्रामीण यांनी २,०००/– रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमान्वये कारवाई केलेबाबत.**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | नाशिक |
| **गुन्हा नोंद कमांक** | कार्यवाही सुरु आहे. |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| **आरोपीचे नाव व कार्यालय** | रमण तुळशिराम गायकवाड,पोलीस हवालदार,ब.नं.१२४३,नेमणुक अभोणा पोलीस स्टेशन, जि.नाशिक ग्रामीण. |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | २,०००/– रूपये |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | २,०००/– रूपये |
| **थोडक्यात माहिती** | यातील तक्रारदार व त्यांचे नातेवाईक यांच्यात भांडण झाल्याने त्यांचे विरुध्द अभोणा पोलीस स्टेशन येथे अदखलपात्र गुन्हा दाखल असून तक्रारदार व त्यांचे नातेवाईक यांच्यातील वाद आपसात मिटला आहे. परंतू आलोसे रमण तुळशिराम गायकवाड, पोलीस हवालदार, ब.नं.१२४३, नेमणुक अभोणा पोलीस स्टेशन, जि.नाशिक ग्रामीण यांनी तक्रारदार व त्यांचे नातेवाईक यांना त्यांच्यावर कोर्टात केस न पाठविणेसाठी तसेच पोलीस स्टेशनमध्ये वाद मिटविल्याचे मोबदल्यात प्रत्येकी १,०००/–रुपये प्रमाणे एकुण २,०००/– रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने सापळापुर्व पडताळणी करुन सापळा आयोजित केला असता आलोसे रमण तुळशिराम गायकवाड, पोलीस हवालदार, ब.नं.१२४३, नेमणुक अभोणा पोलीस स्टेशन, जि.नाशिक ग्रामीण यांनी पंच व साक्षीदार यांचे समक्ष तक्रारदार याचेकडून **२,०००/–रुपये** लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम आज दि.०५/०५/२०२२ रोजी अभोणा पोलीस स्टेशन येथे **स्विकारली** असतांना त्यांना पकडण्यात आले असून त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.


संपर्क पत्ता :– ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक
संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in
ई–मेल :– spacbnashik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार :– acbmaharashtra.net
टोल फ्री कमांक :– १०६४
दुरध्वनी कमांक :– ०२५३–२५७५६२८, २५७८२३०
व्हॉट्स ॲपक :– ९९३०९९७७००


(सतिश भामरे)
वाचक पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक.